दैनिक
महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS INDOASIAN Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ३ रे अंक १५९ वा रविवार दि.१९ नोव्हेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

लातूरात माजी मंत्री निलंगेकर, आ. पवार, आ. कराड यांची दिवाळी तर काँग्रेसच्या आ. देशमुख बंधूचा पत्रकारांसाठी शिमगा !

लातूर :- लातूर शहर व जिल्हा हे सामाजिक - राजकीय सलोख्याचे ठिकाण आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील लातूर हे तालुक्याचे ठिकाण होते पूर्वी निजामाच्या काळात बोरी तालुका तर औसा जिल्हा म्हणजे वसुली भाग होता. स्वातंत्र्यानंतर सारे काही वाटा पळवाटा झाल्या आणि लातूरला यशवंतराव चव्हाण मुळे प्रथमत केशवराव सोनवणे सत्ताधारी बनले टी एस शृंगारे यांनाही न्याय मिळाला चंद्रशेखर बाजपाई आमदार झाले आणि त्यातून विलासराव देशमुख यांच्या विजयाची पहाट उगवली ही आजही चर्चा होतच असते. लातूरचे लोकप्रतिनिधी हे शहर विधानसभा - ग्रामीण विधानसभा आणि जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी हे सर्वसामान्य नागरिकांना शुभेच्छा देऊन कोण काय केले किंवा केले नाही यासाठी दैनिक-साप्ताहिकात मुलाखती देत असतात व्यापारी, उद्योजक जाहिराती देऊन आर्थिक हातभार लावतात लोकप्रतिनिधी ही पत्रकारांना सदिच्छा भेट म्हणून पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतात. त्यात प्रामुख्याने शिवराज पाटील चाकूरकर दिवंगत विलासराव देशमुख यांचा उल्लेख करावा लागेल यात सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनाही वगळता येत नाही परंतु आज घडीला दिवाळीचा शिमगा करून लातूर शहर व ग्रामीणचे लोकप्रतिनिधी हे गालबोट लावीत आहेत काय अशी उलट सुलट चर्चा सर्वत्र होताना दिसते आहे विशेषता काँग्रेसची लोकप्रतिनिधीच्या निष्कर्ततेमुळे किंवा की त्यांच्या अहमभावामुळे आमदार अभिमन्यू पवार आणि माजी मंत्री संभाजी पाटील निलंगेकर, आमदार रमेश आप्पा कराड यांनी लातूर शहरातील पत्रकारांना प्रत्यक्षात भेटून शाल व श्रीफळ देऊन त्यांना उचितपणे सन्मानित केले हा प्रसंग लातूरच्या लोकप्रतिनिधींना धक्कादायक ठरावा असेच लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे. लातूरात येऊन भाजपाचे आमदार दिवाळी साजरी करण्यासाठी पत्रकारांशी गळाभेट घेतात पण लातूरचे काँग्रेसचे आमदार असलेले माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख आणि आमदार धीरज विलासराव देशमुख हे पत्रकारासमोर शिमगा करतात तेही अनभिज्ञपण याचीच खुलेआम चर्चा होताना दिसते आहे.

अण्णा भाऊ साठे यांच्या कथा - कादंबऱ्याचे आठखंड व ऑडिओ ई -बुकचे राज्यपालच्या हस्ते प्रकाशन

मुंबई / प्रतिनिधी :- साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कथा, कादंबऱ्याचे आठ खंड व ऑडिओ, ई -बुकचे प्रकाशन नुकतेच मुंबई विद्यापीठातील दिक्षांत सभागृहात महामहीम राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर ,विधान परिषद उपसभापती नीलम गोऱ्हे , उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा समितीचे अध्यक्ष ना.चंद्रकांत दादा पाटील,शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर समितीचे सदस्य सचिव प्रोफेसर डॉ.संजय शिंदे आदी मान्यवरांच्या हस्ते व समिती सदस्यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे संशोधन संकलन आणि संपादन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने २०२१ ला साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती स्थापन केली असून उच्च व तंत्र शिक्षण मंत्री नामदार चंद्रकांत दादा पाटील हे या समितीचे अध्यक्ष तर शिक्षण संचालक पदसिद्ध निमंत्रक म्हणून कार्यरत आहेत.छत्रपती संभाजीनगर येथील प्रोफेसर डॉ.संजय शिंदे हे समितीचे सदस्य सचिव तसेच कोकणातून डॉ. सोमनाथ कदम हे समितीचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समितीच्या वतीने मागील तीन वर्षापासून अण्णाभाऊंच्या साहित्याचे संकलन ,संशोधन, संपादन व प्रकाशन करण्यासाठी प्रयत्न सुरू होते. सदस्य सचिव प्रोफेसर डॉ.संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सदस्यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या समग्र साहित्याचा अभ्यास व संकलन करून निवडक कथा आणि कादंबऱ्याचे आठ खंड तयार केले तसेच देश आणि विदेशातील युवा पिढीला वाचकांना अण्णाभाऊंच्या साहित्याचे अधिक सूक्ष्मपणे वाचन करता यावे म्हणून वरील आठही खंडाचे ऑडिओ व ई बुक स्वरूपात तयार करण्यात आले आहे. या सर्व साहित्याच्या प्रकाशनाचा समारंभ काही महिने रखडला होता. तो नुकताच दिनांक ९ नोव्हेंबर २०२३ रोजी संपन्न झाला. यावेळी साहित्यरत्न ,अण्णाभाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समितीचे ज्येष्ठ सदस्य प्राचार्य डॉ. माधवराव गाडेकर ,प्राचार्य डॉ. बळीराम गायकवाड ,डॉ. मिलिंद कसबे, डॉ. विजय कुमठेकर, श्री शिवा कांबळे,डॉ. शरद गायकवाड ,डॉ.देवकुमार अहिरे व अण्णाभाऊ साठे यांचे नातू श्री सचिन साठे उपस्थित होते.

साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समितीने अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याच्या आठ खंडाच्या ऐंशी हजार प्रती उपलब्ध करून दिल्या आहेत. राज्य शासनाच्या मुंबई, पुणे ,नागपूर, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर येथील मध्यवर्ती शासकीय ग्रंथालयात या प्रती विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत अशी माहिती समितीचे सदस्य सचिव प्रो.डॉ संजय शिंदे यांनी दिली.

७० वर्षांचा आमचा बॅकलॉग कसा भरून काढणार?

सातारा : मराठा आरक्षणासाठी लेकरे उन्हात आहेत तुमच्याबरोबर मी देखील उन्हात आहे. घाबरून घरात बसलो तर आरक्षण कसे मिळणार? ७० वर्षापासून पिढ्या बरबाद झाल्या. आरक्षण असतानाही आरक्षण मिळाले नाही. मराठे कुणबी नाही मग आता कशा सापडल्या? असा सवाल मराठा आंदोलक मनोज जरांगेंनी केले आहे. ७० वर्षांचा आमचा बॅकलॉग सरकार कसा भरून काढणार आहे. आरक्षण असताना आम्हाला का दिले गेले नाही? आमच्या लेकरांनी असे काय पाप केले असा सवाल मनोज जरांगेंनी केला आहे.मराठा आरक्षणासाठी लढत असलेल्या मनोज जरांगेंच्या सभांचा धडाका सध्या सुरुच आहे. दरम्यान आज जरांगेंची साता-यात सभा झाली. या सभेला सातारा शहराबरोबर पंचक्रोशीतील मराठा बांधव हजर होती. दरम्यान आज साता-याचे खासदार छ. उदयनराजे भोसले आणि आमदार शिवेंद्रराजे भोसले यांचीही मनोज जरांगे भेट घेणार आहेत. मराठ्यांना आरक्षण मिळू नये म्हणून जाणून बुजून षडयंत्र रचले जात आहे. आंदोलनानंतर आता पुरावे मिळायला लागले. ७० वर्षापूर्वी आरक्षण दिले असते तर आज ही वेळ आली नसती. आज मराठ्यांच्या लाखाने नोंदी सापडायला लागल्या आहेत. मराठ्यांना लढायचे माहिती आहे. त्यावेळी पुरावे नाही सापडत म्हणाले आता पुरावे कसे सापडायला लागले. ज्याने लपवले त्यांची नाव समोर आले पाहिजे, असे मनोज जरांगे म्हणाले.आपला विजय निश्चित मनोज जरांगे म्हणाले, २४ डिसेंबरला आपला विजय निश्चित आहे. मराठ्यांनो गाफिल राहू नका. नाहीतर लेकरांचे नुकसान करायला तुम्ही जबाबदार असाल. हैदराबादला समिती नोंदी शोधण्यासाठी गेली. या समितीचा सरकारने अहवाल स्विकारला. ज्या नोंदी मिळतील त्यांना ओबीसीमध्ये आरक्षण मिळणार आहे. परंतु मी दोन भावांमध्ये भेद करू शकत नाही, साता-यात २० हजार नोंदी सापडल्या आहेत. यातच आपले यश आहे. नोंदी नसतील त्याच नोंदीच्या अहवालावर २४ तारखेला सरसकट आरक्षण देणार सांगितले म्हणून उपोषण मागे घेतले. घटनेच्या पदावर बसलेल्याने कायदा तुडवला मराठा आरक्षणाचा लढा आपल्यालाच लढायचे आहे. जेवढे पक्ष झाले त्या पक्षातील एकही नेता मदतीला यायला तयार नाही. त्या नेत्यांना मराठ्यांनी किंमत द्यायची नाही. घटनेच्या पदावर बसलेल्याने कायदा तुडवला आहे असे म्हणत जरांगेंनी छगन भुजबळवर टीका केली आहे. महाराष्ट्राला यशवंतरावानी वेगळी संस्कृती दिली. महात्मा फुलेंचा आदर्श ठेवायला पाहिजे होते. मराठा आणि ओबीसीं मध्ये तेढ निर्माण होऊ देऊ नका. तुमच्या खांद्यावर जबाबदारी आहे. जातीय दंगली घडवून आणायचा डाव आहे, असे जरांगे म्हणाले.

देवरकद्रा मतदार संघातील भाजपा पदाधिकार्यांचा बैठकीला मोठा प्रतिसाद

तेलंगणा राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपाला बहुमताने विजयी करा-आ.कराड

लातूर दि.१८ - जगाचे नेतृत्व करण्याची क्षमता असणारे देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या नेतृत्वात संपूर्ण देशाचा सर्वांगीण विकास मोठ्या प्रमाणात होत असून तेलंगणा राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि गोरगरीब सर्वसामान्य माणसाच्या प्रगतीसाठी भारतीय जनता पार्टी विजयी होणे काळाची गरज आहे असे प्रतिपादन भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी केले.

तेलंगणा राज्यात महेबूबनगर जिल्ह्यातील देवरकद्रा या विधानसभेतील भाजपा उमेदवार कोंडा प्रशांत रेड्डी यांच्या प्रचाराची जबाबदारी महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पार्टीने आ. रमेशअप्पा कराड यांच्यावर सोपवली असून त्यानुसार गुरुवारी देवरकद्रा या मतदार संघात आपल्या सहकार्यासह आ. कराड दाखल झाले आहेत. यावेळी त्यांचे मतदार संघाच्या वतीने मोठ्या उत्साहाच्या वातावरणात स्वागत करण्यात आले.

मतदार संघातील बूथ प्रमुख आणि शक्तीकेंद्र प्रमुख यांची शुक्रवारी व्यापक बैठक आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली यावेळी भाजपाचे अधिकृत उमेदवार कोंडा प्रशांत रेड्डी यांच्यासह भाजपा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, देशात नरेंद्रजी मोदी साहेब यांनी देशाची मान जगात उंचावली असून त्यांच्या नेतृत्वातील केंद्र शासनाने गोरगरीब सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून अनेक योजना सुरू केल्या त्याचबरोबर देशाचा चौफेर सर्वांगीण विकास झपाट्याने होत आहे. ज्या ज्या राज्यात भाजपाचे सरकार सत्तेवर आहे अशा सर्वच राज्यात विविध योजनेच्या माध्यमातून सर्वांगीण विकास केला जात असून भाजपाच्या नेतृत्वातील राज्य देशात प्रगती पथावर आहेत. तेव्हा तेलंगणा राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी भाजपाच्या नेतृत्वातील शासन सत्तेवर येणे गरजेचे असून यासाठी भाजपाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांनी जिद्दीने जोमाने काम करून भाजपाचे उमेदवार कोंडा प्रशांत रेड्डी यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन केले.

या बैठकीस भाजपाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ. रमेशअप्पा कराड यांच्या मार्गदर्शनामुळे देवरकद्रा विधानसभा मतदार संघातील भाजपा कार्यकर्त्यात उत्साह निर्माण झाला आहे. यावेळी आ. कराड यांनी अनेकांशी व्यक्तिगत संवादही साधला. बैठकीपूर्वी आ. रमेशअप्पा कराड यांनी विधानसभा भाजपा कोअर कमिटीची बैठक घेऊन प्रभावी प्रचार यंत्रणा राबविणे, मतदाराच्या गाठीभेटी घेणे, कार्यकर्त्यात सुसंवाद ठेवणे, मोदीजींचे काम मतदारापर्यंत पोहोचणे यासह अनेक महत्त्वपूर्ण सूचना त्यांनी केल्या.

राज्याचे क्रीडामंत्री ना. संजय बनसोडे यांची दिवाळीतही घोडदौड

लोकप्रतिनिधी असावा तर ना. संजय बनसोडे यांच्यासारखा

लातूर :- लातूर शहर व जिल्हा हा काँग्रेसचा बालेकिल्ला असतानाही राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांना मागे टाकून महाराष्ट्र राज्याचे क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी लातूरसह उदगीर - जळकोट विधानसभा मतदारसंघात विकासाची घोडदौड सुरूच ठेवली असून विजयादशमीला अभिवादन करून दिवाळीत ही आम जनतेला शुभेच्छा देऊन पत्रकारांसमक्ष स्वतःची विकासात्मक ओळख करून दिल्याने सर्वत्र कौतुक होताना दिसते आहे. कोणत्याही राजकीय पक्षाचा आमदार खासदार मंत्री हा केवळ मतदानापुरताच नागरिकांना जवळ करतो परंतु आजवरच्या कारकिर्दीत एकमेव संजय बनसोडे हेच लोकात मिसळून जनतेची गऱ्हाणी सोडून त्यांच्या सुखदुःखात तन-मन-धनाने सहभागी होऊन पत्रकारासमोर मी संजय बनसोडे म्हणून सामोरे जाताच हीच त्यांची खरी ओळख ठरावी कारण कोणत्याही प्रसंगी ते लोकात पत्रकारासमोर ताठ मानेने उभे राहतात हीच त्यांच्या कार्याची यशस्वी कारकीर्दीची दिवाळीतली घोडदौड म्हणावी लागेल अशीच लोकप्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे. राजकीय बेरजेच्या कारणामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार यांनी संजय बनसोडे यांना राज्यमंत्रीपद दिले पण राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार यांनी संजय बनसोडे यांना कॅबिनेट किडा व युवक कल्याण व बंदरे मंत्रीपद दिले असतानाही कोण कोणत्या पक्षाचा कोणत्या जातीचा वगैरे शहानिशा न करता संजय बनसोडे हे धर्मनिरपेक्ष भावनेने सर्वांना सहकार्य करीत असतात सर्वांच्या सुख - दुःखात सहभागी होत असतात ते पत्रकारांना सोबत घेऊनच वावरत असतात कारण प्रत्यक्षात कार्याची सक्षम समक्ष पावती म्हणूनच ते पत्रकारांसमोर असतात त्यांचे मूळ कारण म्हणजे प्रसिद्धी विनाकार्य म्हणजे अंधारात पोरीला डोळा मारण्यासारखेच असते हे विलासराव देशमुख यांचे वक्तव्य ते डोळ्यासमोर ठेवूनच कार्यरत असावेत पण संजय बनसोडे यांच्यासारखा मंत्री होणे नाही हे शाश्वत सत्य नाकारता येत नाही एवढेच असा बोलबाला होताना दिसतो आहे. आमदार, लोकप्रतिनिधी कसा असावा त्यांचे ज्वलंत उदाहरण म्हणजे संजय बनसोडे हेच आहेत.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

संपादकीय....

विक्रमी विराटचे वैश्विकत्व!

विराटने स्वत:चा स्वतंत्र असा मार्ग चोखाळला. त्यातून जे रसायन घडले, त्याचा खुद्द सचिनलाही हेवा वाटतो, हेही विराटचे यशच. विराटच्या शतकी प्रवासापेक्षाही अद्भुत आणि सुंदर आहे, त्याने केलेला व्यक्तिमत्त्वातील बदल. तो करताना कुठेही त्याचे क्रिकेटप्रेम किंवा तंदुरुस्तीविषयीची उत्कटता पातळ झालेली नाही. भारतीय क्रिकेटच्या पंढरीत, क्रिकेटच्या आद्य नायकांसमोर विराट कोहलीने एकदिवसीय शतकांचे विक्रमी अर्धशतकी शिखर सर केले. असा योग फार थोडय़ांच्या नशिबी येतो. विराटचे विक्रमी पन्नासावे शतक विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात झळकणे हे तर अधिकच अभूतपूर्व. वैयक्तिक विक्रम आणि सांघिक कामगिरी यांचा मेळ सहसा साधला जात नाही. विराट कोहलीच्या बाबतीत तोही योग जुळून आला. यंदाच्या विश्वचषक स्पर्धेत उपांत्य फेरीपर्यंतच्या दहा सामन्यांमध्ये दोन अपवाद वगळता उर्वरित सामन्यांत विराटने पन्नास धावांच्या पलीकडे मजल मारलेली आहे. यात दोन शतकांचाही समावेश आहे. आणखी किमान दोन सामन्यांत तो शतकाच्या आसपास येऊन बाद झाला. शतकासमीप आल्यावर विक्रमासाठी सावधपणे खेळू लागतो, असा आरोप विराटवर समाजमाध्यमांवर झाला. तो करणाऱ्या बहुतेकांना भावनिक लाटेवर आरूढ होणे अंगवळणी पडलेले असते आणि बुद्धी नामे आदिम मानवी गुणाचा विसर पडलेला असतो. विराटची ५० पैकी २७ शतके लक्ष्याचा यशस्वी पाठलाग करताना नोंदली गेली आहेत, हे यांच्या गावीही नसते. हा हिशोब केवळ लक्ष्याचा यशस्वी पाठलाग करतानाच्या शतकांचा आहे. शतकाच्या आधारावर यशस्वी लक्ष्य उभारणीची उदाहरणेही विराटच्या बाबतीत डझनावरी सापडतील. तो स्वार्थी आहे, असे अलीकडेच एका ज्येष्ठ निवृत्त क्रिकेटपटूने सांगितले. सांघिक खेळात स्वार्थ साधूनच संघाची कामगिरी उंचावता येते. गोलंदाजाने बळी मिळवणे आणि फलंदाजाने धावा काढणे यात मुळातच स्वार्थी हेतू गृहीत धरलेला असतो. धावा न काढणारा फलंदाज किंवा बळी न घेणारा गोलंदाज राष्ट्रीय संघात सोडा, पण क्लब किंवा गल्ली संघातही टिकून राहणे अशक्यच. विराट कोहली किंवा त्याच्या आधी सचिन तेंडुलकर यांच्या शतकांच्या राशींचे अवलोकन करताना, या शतकांच्या अनुपस्थितीत भारताची यशोगाथा कशी काय साधली गेली असती याचा विचार व्हायलाच हवा. एखाद्यावर सरसकट ‘स्वार्थी’ असा शिक्का मारताना, त्याच्या त्या टप्प्यापर्यंतच्या खडतर प्रवासाचे विस्मरण होते. सचिनही स्वार्थासाठी खेळतो, असा आरोप झालाच. सचिनचे शतक म्हणजे भारत हरणार, असे एक बिनडोकी विधान प्रसृत करण्यात मराठी जनच पुढे असायचे. पण सचिनच्या शतकांनी भारतीय क्रिकेट संघाला स्थैर्य आणि आत्मविश्वास दिला. आणि तरीही सचिनच्या १०० शतकांपैकी (४९ एकदिवसीय अधिक ५१ कसोटी) कित्येक खेळींमुळे भारताला विजय साकारता आला किंवा पराभव टाळता आला. सचिनला गुरुस्थानी मानणाऱ्या देशातील असंख्य क्रिकेटपटूंमध्ये विराटही आहे. परंतु सचिनकडून प्रेरणा घेताना ‘सचिनसारखाच’ बनण्याचा प्रयत्न त्याने कधीही केला नाही, हे त्याचे नि:संशय यश. एरवी दैवताच्या भक्तिरसामध्ये आकंठ बुडणाऱ्यांचा हा देश. कित्येकांना अशा डुबक्यांतून बौद्धिक मांद्य येते आणि त्यांची स्वत:ची अशी ओळख कधीही निर्माण होऊ शकत नाही. विराटने हे कटाक्षाने टाळले. वानखेडेवर विराटच्या परवाच्या अर्धशतकी खेळीचे साक्षीदार दस्तुरखुद्द व्हिव्हियन रिचर्डसही होते. ते तर आद्य एकदिवसीय फलंदाज. सचिन आणि रिचर्डस हे दोघेही विराटच्या विक्रमाचे साक्षीदार असणे हाही विलक्षण योगायोग. कारण विराटच्या फलंदाजीत सचिनची निर्दोष तंत्रशुद्धता आणि रिचर्डस यांचा गुर्मीसदृश आत्मविश्वास यांचा अभूतपूर्व मिलाफ दिसून येतो. ज्यांच्या निव्वळ मैदानावरील आगमनाने जगभरातील क्रिकेट मैदानांमध्ये प्रेक्षक आदराने उठून उभे राहतात असे हे तीन फलंदाज. हा मान इतिहासात बहुधा केवळ सर डॉन ब्रॅडमन यांनाच लाभला असावा. एकदिवसीय क्रिकेटमध्ये निर्णायकता असल्यामुळेच कसोटी क्रिकेटपेक्षाही ते अधिक लोकप्रिय झाले. बराच काळ क्रिकेटमधील जगज्जेता ठरवण्याचे ते एकमेव परिमाण मानले गेले. अशा या क्रिकेटमध्ये लक्ष्याचा पाठलाग करणे ही सर्वाधिक आव्हानात्मक बाब असते. विराट कोहली या कलेत निपुणोत्तम. हे केवळ फलंदाजीतील तंत्रशुद्धतेने साधत नाही. त्यासाठी एकाग्रता, हिंमत आणि चतुराईदेखील लागते. त्यापेक्षाही मोठी महत्त्वाकांक्षा लागते. रिचर्डस आणि सचिन यांच्यासाठी क्रिकेट हा निव्वळ खेळ होता. सचिनसाठी त्याच्या जोडीला कोटय़वधी क्रिकेटरसिकांच्या आशा असायच्या. तरीही त्याला परिस्थितीनुरूप खेळ करावा लागला. विराटने परिस्थिती निवडली आणि तिला वाटेल तेव्हा आणि तशी बदलण्याची महत्त्वाकांक्षा बाळगली. नव्वदच्या दशकातला सचिन, नवीन शतकातला सचिन यांच्यात बदल होत गेले. पण बदलांचा कालखंड मोठा होता. विराटच्या बाबतीत हे बदल चटकन होत गेले, एखाद्या मोटारीने झटपट गियर बदलावे तसे. सचिन कोणत्याही परिस्थितीला स्थिरचित्त एकाग्रतेने आणि शालीनतेने सामोरा गेला. विराटला सुरुवातीला तशी गरज वाटली नाही.

याचे कारण सचिनचा उदय झाला त्या काळात भारतीय संघ संक्रमणावस्थेत होता. सुनील गावस्कर निवृत्त झाले होते नि कपिलदेव यांच्या कारकीर्दीचा उत्तरार्ध सुरू झाला होता. त्या तुलनेत विराटचे पदार्पण स्थिर आणि विजयी संघात झाले. परंतु सचिन आणि तत्कालीन कर्णधार महेंद्रसिंह धोनी यांच्या व्यक्तिमत्त्वांचा त्याच्यावर हळूहळू प्रभाव पडत गेला. हे बदल स्वीकारण्याचा परिपक्वपणा विराटने दाखवला, हे उल्लेखनीय.सचिन महान क्रिकेटपटू ठरतो. तेच धोनीच्या बाबतीत म्हणता येईल. विराट कोहलीच्या बाबतीत सुरुवातीस तसे काहीच आढळून आले नाही. अफाट गुणवत्तेच्या जोडीला असीम चंचलता त्याच्या ठायीठायी भरली होती. यातूनच मैदानावर प्रेक्षकांच्या दिशेने शिवीगाळ करणे, आक्षेपार्ह अंगविक्षेप करणे, प्रतिस्पर्धी खेळाडूंवर धावून जाणे असले प्रकार दिसून यायचे. काहींना त्या आक्रमकपणात नवीन भारताचा हुंकार वगैरे आढळून यायचा. पण यशस्वी खेळाडूची खरी ओळख मैदानावर सभ्यपणा दाखवूनच अधोरेखित होते हा ‘सचिनगुण’ विराटने विलंबाने का होईना अंगी बाणवला. तसा बदल स्वत:मध्ये घडवून आणण्यासाठी आवश्यक असा रसरशीत उमदेपणा विराटने दाखवला, त्यामुळेच इथवर मजल मारल्यानंतर विराटमधील क्रिकेटपटूइतकेच– किंबहुना अधिक त्याच्यातील माणूसपणाचे गुणगान होत आहे. मैदानाप्रमाणेच मैदानाबाहेरही महत्त्वाच्या विषयांवर भूमिका घेण्याबाबत तो सचिनलाही मागे टाकतो.आक्रमक विराटमध्ये ‘तारणहार’ मानसिकता ठासून भरली होती. आसमंतात सारे काही सुरू आहे, ते आपल्यामुळेच, आपल्यासाठीच असे वाटणाऱ्यांची या देशात कमतरता नाही. परंतु यशस्वी क्रिकेटपटू आणि उत्तम कर्णधार असूनही कपाटामध्ये एकही चषक येईना.

आदर्श राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाज.!!

माझ्या समाज लिखाणा बद्दल या दिवाळीच्या दिवसांतच
सोक्षमोक्ष लावूया नंतर मात्र ओबीसी सुतार समाजात
कोणीही कुजबुज करु नका.!!
माझ्या समाज लिखाणावर आक्षेप घेणाऱ्याच सर्वंच लहान
थोर महान ओबीसी सुतार समाज दिग्गज कर्तबगार मित्रांनाच
जाहीर आमंत्रण.!!
माझ्या समाज लिखाणावर मला ओबीसी सुतार समाजात
बुद्धिप्रामाण्यवादी समजदार परिपक्व दृष्टीनेच आणि चिकित्सक
नजरेनेच कोण कोण काय काय शब्द सुमनांचा मनमुराद
भडीमार केला असेल त्या त्या सर्वंच कर्तबगार कर्तृत्ववान
सुतार समाज मित्रांना समाज जाहीर आमंत्रण देतो सगळाच
गैरसमज दुरच करतो.!!
दिवाळी नंतर मात्र माझ्या समाज लिखाणावर अवैचारिक
असंवैधानिक मुस्कटदाबी आणि ओबीसी सुतार समाजात
आदळउपट नको.!!
आपसांत कुजबुज न करता थेट समोरासमोर सुज्ञ समाज
जाहीर चर्चा संवादाचा कार्यक्रम.!!
दिवाळीच्याच निमित्ताने मन:पूर्वक शुभेच्छा.!!
दिवाळीच्या निमित्ताने वैचारिक फटाके फोड्या आणि नंतर
कोणीही फुसके बार सोडूच नका.!!
आदर्श ओबीसी सुतार समाजात माझ्या समाज लिखाणावर
कोणीही तिळपापड करुच नका.!!
तर्कशुद्ध मुद्देसूदच खुली चर्चा समाज संवाद सोशल
माध्यमातूनच प्रसिद्ध करण्यात येईल जसाचाच तसा
कोणताही फेरबदल न करता.!!
ओबीसी सुतार समाजातील समाज नेतेगिरीच्या संदर्भात
अस्मिता आणि गरीमा या बद्दल जाहीर चर्चा संवाद करूया
समज गैरसमज दुर करूया.
समाजात जाहीर आमंत्रण जाहीर निमंत्रण.!!
माझं समाज लिखाण बंद करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या
सुशिक्षित सुतार समाज मित्रांसोबत दिवाळीच्या निमित्ताने
सविस्तर चर्चा संवाद.!!
समाजात सत्यवादी सत्याला प्रमाण मानणारे मान्यवरांनी
आवर्जुन यावर आपली प्रतिक्रिया द्यावी दोन तोंडी अजिबात
बोलणार नाहीत!!
समाज जाहीर आमंत्रण जाहीर निमंत्रण.!!
माझं समाज लिखाण बंद करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी
आटोकाट अथक खटाटोप करून प्रचंड मेहनत करून आपली सर्व ऊर्जा आणि आपला
सर्व बहुमुल्य अमुल्य वेळ खर्ची घातलेला असेल त्या सर्वंच
कर्तृत्ववान महान कर्तबगार दिग्गजांना सुशिक्षित उच्चशिक्षित
सर्वगुणसंपन्न समजदार समाज अभ्यासक समाज जाणकार
समाज कैवारी समाज तारणहार समाजमान्य स्वयंघोषित
ओबीसी सुतार समाज नेतेमंडळी महोदयांना समाज जाहीर
आग्रहाचे निमंत्रण आमंत्रण माझ्या समाज लिखाणावर
यथासांग सविस्तर तर्कशुद्ध मुद्देसूद संवैधनिक पध्दतीने
सखोल विचार मंथन चर्चा करण्यासाठीच.!!
अनिलजी या लेखणी बंद संसदीय कर्तबगार
कर्तृत्ववान कार्यसमिती कार्यसम्राट ओबीसी सुतार सम्राट
महान समाज सम्राट तथाकथित समाज बहाद्दर बुद्धिवादी
बुद्धिप्रामाण्यवादी बुद्धिवान बुद्धिजीवी सुशिक्षित उच्चशिक्षित
श्रीमंत एका आवाजात आपल्या धडाकेबाज
तडफदार जिगरबाज प्रचंड समाजप्रिय ओबीसी सुतार
समाज नेतृत्वाखाली जमिनीवर
लाखोंच्या संख्येने ओबीसी सुतार समाज बांधवांनाच
राज्यातीलच मध्यवर्ती ठिकाणीच
अथवा राज्यातील कोणत्याही जिल्ह्यात
ओबीसी,संविधान,जनगणना तसेच आरक्षण इत्यादी समाज
जागृती मेळाव्यात एकत्रित करणाऱ्या या समाज मंदियाळीला
बुलडाणा जिल्ह्यातील ऐतिहासिक स्थळ जिजाऊ आई
साहेबांचे जन्मस्थान असलेल्या सिंदखेडराजा
इथं सदिच्छा भेटीसाठी आवश्यक घेऊन या लवकरच
घेऊन या स्नेह भोजनाची व्यवस्था मी करतो प्रमोद सूर्यवंशी
आग्रहाची समाज विनंती करतो.कृपया मज पामराला
आपल्या सेवेची
संधी द्यावी तारीख आणि वेळ आपल्याच सोयीनुसार.
वरीलप्रमाणे उल्लेख केलेल्या सर्वंच मित्रांनी एकत्रित येऊन
मला उपकृत करावे!!
!! विशेष गुणात्मक समाज टीप****
सदर सर्वंच समाज जाहीर चर्चा संवादाचाच खुलासा
संबंधित माझीच समाज लेखणी बंद करण्यासाठीच लई लई
तत्पर असणाऱ्या माझं समाज लिखाण बंद करण्यासाठीच
जबाबदारी घेणाऱ्या अशा सर्वंच ओबीसी सुतार दिग्गजांचे
अर्थात सर्वच सर्वच उपस्थित मान्यवरांचे नाव आणि
रंगीत फोटोबाजी छायाचित्रे मात्र समाज जाहीर प्रकाशित
करण्यातच येईलच विशेषत: सदर चर्चा संवादाच्याच
कार्यक्रमाचाच संपुर्ण तपशीलवार व्हिडीओ तयार करण्यातच
येईलच ओबीसी सुतार समाजहित समाजहितासाठी.!!
जय जय विश्वकर्मा जय ओबीसी जय सुतार.!!
प्रमोद सूर्यवंशी चिखली मातृतीर्थ बुलडाणा.!!

संपर्क:–
८६०५५६९५२१
३१ ऑक्टोबर २०२३.!

राजकीय अंजेड्यात अडकला धर्म

भारत हा लोकशाही प्रधान देश आहे. भारतीय संविधाना नुसार देशाचे प्रशासन चालले तर देश व देशातील जनता जगाचे नेतृत्व केल्या शिवाय राहणार नाहीत. संविधानाच्या रुपाने भारताकडे जगातील सर्वात मोठी अशी ताकत आहे की प्रत्येकाने संविधाना नुसार वागायचे ठरवले तर अर्ध्या पेक्षा जास्त समस्या विचार करतानाच संपतात आणि संविधाना नुसार एक महिना प्रशासन चालवले तर भारत जगात समृद्ध देश झाल्या शिवाय राहणार नाही. परंतु भारतीय संविधानानुसार काम का केले जात नाही या मागे हजारो वर्षाचे शोषण, पिळवणूक, विषमता, जातीवाद अस्पृश्यता व सर्वात महत्वाची माणसाला माणुन म्हणून न स्विकारण्याची माणसिकता दडलेली आहे. संविधानाने हजारो वर्षापासून चालत आलेले लिखित अलिखित नियम बाजूला सारून जातीप्रधान देशामध्ये हजारो जातीच्या लोकांना भारतीय ओळख दिली, स्त्रि पुरुष कोणत्याही प्रकारचा भेद न करता समान संधी, समान अधिकार देऊन समान मानसन्मान व समान किंमत दिली. हिच गोष्ट आजही काही लोकांच्या जिव्हारी लागते म्हणून ते लोक संविधानाबद्दल अपप्रचार करतात व संविधानाने दिलेले समान हक्क–अधिकार, समता, बंधुता, न्याय ह्या गोष्टी ज्यांना मान्य नाहीत ते लोक आजही प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सत्तेत आहेत. व पुन्हा संविधानाने दिलेले हक्क अधिकार, समता, बंधुता न्याय व शिक्षण हिसकावून घेऊन पुन्हा धार्मिक गुलामगिरी प्रस्थापित करण्याचा प्रयत्न या संविधान विरोधी शक्ती कडून सुरु आहे. संविधानीक स्वायत्त संस्थाना राजकीय आपल्या हातचे बाहुले बनवून त्याचा वापर सरकारच्या मर्जी ने करून घेतला जात आहे. स्वायत्त संस्थेतील कर्मचारी व अधिकारी यांना योग्य पद्धतीने काम करू दिले जात नाही आणि कर्मचारी अधिकारी राजकीय दबावाखाली का येतात? राजकीय षडयंत्रात अडकून स्वायत्त संस्थेतील कर्मचारी अधिकारी आपले इमान राजकीय पक्षाच्या दावनीला का बांधले जाते हा स्वतंत्र विषय होऊ शकतो. पण राजकारण हे कामाच्या, लोकविकासाच्या आणि शिक्षण, आरोग्य, रोजगार, महागाई, कृषी विकास, लघु व कुटीर उद्योग या मध्ये केलेल्या कामावर करणे गरजेचे असते. खरं तर प्रत्येक राजकीय पक्षाला भारतीय संविधान आणि जनकल्याण याला धरून कोणत्याही प्रकारची जातीय, धार्मिक तेढ वा विषमता प्रस्थापित न होता धर्म, जात निरपेक्ष निवडणूक अजेंडा तयार करणे आवश्यक असते. परंतु लोकांचे कल्याण हे शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा, महागाई वर नियंत्रण, कृषी विकास व कृषी मालाला भाव यावर अवलंबून असते. परंतु गेल्या काही वर्षापासून शिक्षणाचे खाजगीकरण करून शिक्षणाचा व्यापार केला. शासकीय शिक्षण संस्था बंद पाडून खाजगी शिक्षण संस्था ना महत्त्व देऊन गोरगरीब लोकांच्या विद्यार्थ्यांना शिक्षणापासून दुर ठेवण्याचा पुन्हा प्रयत्न केला जात आहे. सार्वजनिक संपती खाजगी लोकांना विकुन तेथील लाखों करोडोचे रोजगार कमी केले. सार्वजनिक संपत्ती विकल्याने त्यातून आलेला पैसा आणि शासकीय नोकरी कमी केल्याने पगाराचा बचत झालेला पैसा तसेच प्रत्येक गोष्टी वर वाढलेला अनियंत्रित कर यातून आलेला पैसा सरकार नेमका खर्च करते तरी कुठे हे एक भयानक रहस्य आहे. आणि सदुसष्ट वर्षात जेवढे कर्ज काढले नाही त्यापेक्षा जास्त कर्ज काढून सरकारने देशाला भिकेला लावले. हा एवढा पैसा नेमका खर्च कुठे झाला? हा विषय खुप गंभीर आहे. परंतु यावर कोणीच बोलायला तयार नाही. प्रत्येकाला आपापला वाटा मिळाल्याने सर्वजन गप्प बसले आहेत परंतु यामुळे देश कंगाल राजकीय नेते व उद्योगपती मालामाल आणि जनता मात्र बेहाल झाली आहे. जनतेच्या प्रश्नांवर लक्ष द्यायला कोणी नाही, उपासमार, कुपोषण, शेतकरी स्वहत्या, शिक्षणाचा घसरता दर्जा, शिक्षण घेऊन बेरोजगार तरुणांची संख्या, महिला प्रश्न, असे असंख्य प्रश्न व समस्या असताना ह्या समस्येवर लोकांचे लक्ष जाऊ नाही म्हणून सतत लोकांना धर्म जातीचा आधार घेऊन भावनिक करून भटकवले जाते. लोक जाती धर्माच्या नावावर भडकतात, वाद पेटतो जे बेरोजगार आहेत त्यांचा वापर या कामासाठी करून बेरोजगार तरुणांना काम देण्याऐवजी भडकलेल्या तरुणांकडून काही अनुचित प्रकार घडला की त्याच्या वर गुन्हे दाखल करून त्याचे आयुष्य उद्ध्वस्त केले जाते. बर सत्ताधारी लोकांनी असे करत असताना स्वतः ला विरोधी पक्ष माणणारे पण प्रत्यक्षात विरोधी पक्ष नसलेले लोक ही स्वतः च्या जाती धर्मातील तरुणांवर गुन्हे दाखल होताना गप्प बसतात. यातून राजकारणाची पातळी किती घसरली हे लक्षात येते. राजकारण हे लोकांच्या विकासाचे महत्वपूर्ण माध्यम आहे परंतु या लोकांनी याचा चुकीचा वापर करून एवढे मलिन केले की आज सर्वसामान्य लोकांच्या मनात राजकीय नेते व राजकीय पक्ष यांच्या बद्दल आदर आपुलकी राहलेली दिसत नाही. काही भक्त लोक असतात तो भाग सोडला तर अनेक नेत्याच्या, सत्ताधारी पक्षातील मोठ्या नेत्याच्या पैसा, सत्ता व इतर बळाचा वापर करूनही सभा अयशस्वी झाल्याचे अनेक उदाहरणे आहेत. कारण लोकांना आज थोडफार का होईना पण कळत आहे. राजकीय नेत्यांची व पक्षाची बदमाशी लक्षात येत आहे. जनते मध्ये थोडीफार का होईना जागृतता निर्माण होत आहे परंतु राजकीय पक्ष व राजकीय नेते आजही जनतेला धर्माच्या व जातीच्या व देवाच्या नावावर भावनिक बनवण्याचे काम करून मताचे भिक मागताना दिसत आहेत. राजकीय सभेला धार्मिक स्वरूप देऊन राजकीय सभेमध्ये वेगवेगळ्या देवाचे नाव घेऊन लोकांकडे मतासाठी हात पसरावे लागत असतील तर त्यांनी आपल्या कारकिर्दीत किती कामे केले याची कल्पना येईल. लोकांसाठी केलेल्या कामाची उजळणी करण्याऐवजी जर धर्माचा आधार घेऊन, देवाचा आधार घेऊन भावनिक केले जात असेल तर सत्तेच्या नावाखाली यांनी जनतेला किती लुटले असेल? खोटं बोलुन जनतेची दिशाभूल करणे हा राजकीय लोकांचा धंदा च होऊन बसला पण आता भावनिक बनवून देवाच्या नावाचे नाव घेऊन देवाच्या नावाचाही यांनी बाजार लावला. कर्मा ऐवजी धर्माला महत्त्व देणारे काही महाभाग या षडयंत्रात फसतात देखील तो भाग वेगळा आहे. विकासाच्या, शिक्षणाच्या नावावर लोकांसमोर मत माघण्या ऐवजी हनुमान, रामाचा आधार घेतला जात असेल तर तुम्ही कोणकोणती कामे केले हे कोण सांगणार? तरुणांना शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा, महागाई वर नियंत्रण यावर निवडणूक अजेंडा असायला पाहिजे परंतु हे बाजूला सारून याबद्दल एकही शब्द न बोलता, आणि स्वतः च्या भाषणात नवीन एम्स, आयायटी, आय आय एम बांधल्याचे दावे करून प्रधानमंत्री यांनी मनाचा मोठेपणा दाखवून एकाही एम्स, आय आय टी, आय आय एम व इतर विद्यापिठाचे उद्घाटन न केल्याने जनताच त्यानी केलेले काम शोधत आहेत. कारण रेल्वे ला हिरवा झेंडा दाखवण्यासाठी मोदी साहेब हजर राहतात तर देशात एम्स, आय आय टी , आय आय एम, इतर विद्यापीठ दर महिन्याला ओपण होत असताना मोदी साहेब उद्घाटन का करत नसतील हा खुप सखोल संशोधनाचा विषय आहे. म्हणून केवळ बोलुन काहीच होत नाही. शासकीय संरक्षणात राहून माणूस काहीही फेकु शकते म्हणून पत्रकार परिषद घेतल्या जात नाही. एकंदरीत आपल्या कामाचा लेखाजोखा जनतेने माघु नये आणि मतासाठी जनतेसमोर हात तर पसरायचे तर सध्या खुप मोठा आणि क्रांतीकारी निर्माण सत्ताधारी पक्ष घेत असुन आपल्या प्रचार सभेमध्ये मांडत आहेत. तो निर्णय व आश्वासन असे आहे की ते शिक्षण, आरोग्य, बेरोजगारी यावर काम करो कि न करो. परंतु रामाचे दर्शन करण्यासाठी ते जाण्या येण्याची मोफत सुविधा करून देतील. एवढा क्रांतीकारी निर्णय घेऊन देशाची अर्थव्यवस्था बहुतेक एक नंबर वर येईल असे वाटते आणि लोक टाळ्या वाजवतात. मिडिया वाले प्रश्न विचारत नाहीत तेव्हा सर्वांची किव येते. रोजगाराचा दावा करणारे सरकार हे मान्य करते की आपण कोणते ही काम केले नाही. बेरोजगारी मोठ्या प्रमाणात आहे. लोकांची खायची सोय नाही तर लोक बाहेर कसे जाणार. राम मंदिराला भेट देण्यासाठी लोकांकडे पैसा नाही एवढे कंगाल आपण त्यांना बनवले आहे हे त्यांच्या च भाषणातून सिद्ध करतात म्हणून आलटून पालटून सर्वांचा राम मंदीराला भेट देण्यासाठी सर्वांचा खर्च सरकार करेल म्हणजे केवढे मोठे आंतरराष्ट्रीय काम हे सरकार करणार असेल विचार करा. सर्वांच्या शिक्षणाची फि सरकार भरेल, सर्वाच्या दवाखाण्याचा खर्च सरकार भरेल, सर्वांच्या हाताला काम सरकार देईल, नोकरी सरकार देईल. नोकरी तुन पैसा मिळाला की समुद्धी होईल आणि मग अयोध्या च काय अमेरिका पण फिरून या आणि तेही तुमच्या कष्टाच्या पैशावर असे आश्वासन का देत नसतील ? कारण त्यांना माहिती आहे लोक जागृत होत आहेत. शिक्षण, नोकरी, याविषयी आश्वासन दिले तर लोकांना पटणार नाही. आणि सर्वात महत्वाची गोष्ट ज्या देशात देशांतर्गत एक वेळ फिरण्याचा खर्च उचलण्याची जबाबदारी जर सरकार ला घ्यावी लागत असेल तो देश आर्थिक दृष्टीने किती कमकुवत असेल याची कल्पना ही करू शकत नाही. म्हणून राजकीय अजंड्यात धर्माला आणुन पुन्हा लोकांना भावनिक व मुर्ख बनवले जात आहे. लोकांना सर्व समस्येमधुन बाहेर यायचे असेल तर सर्वांनी मिळून ईव्हीएम ला विरोध केला तर सर्वजण जनकल्याणाचे काम हाती घेतील. म्हणून राजकीय नेत्यांचे मानसिक खच्चीकरण करायचे तर ईव्हीएम बंद करून बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्याचा आग्रह धरला तर राजकीय अजेंडा मधुन धर्माचा आधार बाजूला जाऊन कामाचा अजेंडा तयार होईल व येणाऱ्या पिढीसाठी नोकरी, शिक्षण, आरोग्य सुविधेचा आशेचा किरण दिसेल.

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

वारंवार समजावून देखील मुले वाद घालतात?मग, ’या’ ट्रिक्सचा वापर करून मुलांना लावा वळण

वारंवार समजावून देखील मुले वाद घालतात?

आपला मुलगा किंवा मुलगी हे समजूतदार असावेत. असे प्रत्येक पालकाला वाटत असते. त्यासाठी, मुलांना योग्य वळण आणि मुलांना योग्य संस्कार देण्याचे काम पालक करत असतात.मात्र, अनेकदा पालकांच्या अतिलाडामुळे मुले जास्त हट्टी आणि जिद्दी होतात. मग, कोणत्याही गोष्टीवरून वाद घालणे? चिडचिड करणे आणि उगाचच रडणे अशा गोष्टींवरून घरात वाद निर्माण होतो.अशावेळी मग त्यांना कसे शांत करावे? त्याला आणि तिला कसे समजावून सांगावे? असा प्रश्न पालकांना पडतो. अनेकदा तर किती वेळा जरी समजावून सांगितले तरी देखील मुले ऐकत नाहीत. अशामुळे घरातील वातावरण ही बिघडते. मुलांना समजावण्यासाठी आणि त्यांना योग्य वळण लावण्यासाठी काही ट्रिक्स आज आम्ही सांगणार आहोत.चिडचिडेपणा होण्यामागचे कारण जाणून घ्या कधीकधी मुलांना ज्या गोष्टींचा त्रास होतो किंवा ज्या गोष्टींमुळे त्रास होतो, ते त्यांच्या चिडण्यामागचे कारण नसते. अनेकदा काही शारीरीक आणि मानसिक समस्यांमुळे देखील मुलांचा चिडचिडेपणा वाढतो.त्यांना या गोष्टींचा त्रास होतो आणि त्या भावना व्यक्त करता येत नसल्यामुळे ही मुलांची चिडचिड वाढू शकते, हे पालकांनी लक्षात घ्यायला हवे. त्यामुळे, अशा परिस्थितीमध्ये पालकांनी मुलांच्या चिडण्यामागचे खरे कारण आहे? ते जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.मुलांसोबतचे नाते घट्ट करा मुलांसोबतचे नाते घट्ट करण्यासाठी मुलांना पुरेसा वेळ देणे महत्वाचे आहे. पालकांनी मुलांसोबत संवाद साधायला हवा, त्यांच्या आवडीचे खेळ खेळायला हवेत. या गोष्टींमुळे मुलांमधील हट्टीपणा, चिडचिडेपणा कमी होण्यास मदत होते, आणि मुलांचे पालकांसोबतचे नाते घट्ट होते.मुलांची प्रत्येक डिमांड पूर्ण करू नका मुलांना एखादी गोष्ट हवी असल्यास ते त्याची डिमांड पालकांकडे करू लागतात. त्या गोष्टीचा हट्ट धरतात आणि रडतात. अशावेळी पालकांनी त्यांच्यावर लगेच चिडता कामा नये. अशा परिस्थितीमध्ये मुलांना काहीवेळ एकटे सोडा, त्यांच रडण थांबल्यावर ते शांत झाल्यावर पालकांनी त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे.तसेच, ती गोष्ट तुला नाही मिळू शकत ती का गरजेची नाही किंवा ती नंतर तुला मिळेल याबद्दल मुलांना समजावून सांगण्याचा प्रयत्न पालकांनी करावा.

केसांमध्ये वारंवार फाटे फुटतात? मग, जाणून घ्या ‘ही’ कारणे

केसांची वाढ चालू झाली की केसांना फाटे फुटणे ही अतिशय सामान्य बाब झाली आहे. परंतु, अनेकदा केसांची ही समस्या महिलांसाठी डोकेदुखी ठरते. कारण, केसांना फाटे फुटल्यावर केस अधिक खराब दिसू लागतात.मग, ही समस्या दूर करण्यासाठी महिला केस कापतात. मात्र, केस कापल्याने ही समस्या तात्पुरत्या स्वरूपात दूर होते. शिवाय, सतत केस कापल्याने केसांची वाढ खुंटण्याचा धोका ही असतो.केसांना फाटे फुटल्यामुळे केस खराब तर दिसतातच, शिवाय, केस कोरडे आणि निस्तेज दिसू लागतात. ही समस्या दूर करण्यासाठी मग अनेक प्रकारचे उपाय केले जातात.मात्र, केसांना फाटे फुटण्यामागची कारणे कोणती? हे अनेकांना माहित नसते. त्यामुळे, आज आपण केसांना फाटे फुटण्यामागची कारणे कोणती आहेत? ते जाणून घेणार आहोत.केसांना सतत कलर केल्याने किंवा केसांवर केमिकलयुक्त शॅम्पू किंवा कंडिशनर्सचा वापर केल्याने केसांना फाटे फुटण्याची शक्यता असते. या केमिकल्सने युक्त असलेल्या प्रॉडक्ट्सचा केसांच्या मुळांवर परिणाम होतो.केसांची मुळे कमकुवत होऊन केसांना फाटे फुटू लागतात. अशा परिस्थितीमध्ये तुम्ही घरगुती उपायांचा वापर करून ही समस्या दूर करू शकता.हेअर ट्रिमिंग न करणे जर तुम्ही वाढलेले केस बऱ्याच दिवसांपासून कट केले नाहीत किंवा हेअर ट्रिमिंग केले नाही तर मग, केस अधिक कोरडे होतात. एका रिसर्चनुसार, केस जास्त दिवस ट्रिम न केल्याने केसांमध्ये कोरडेपणा आणि फ्रिझीनेसपणा अधिक वाढतो.शिवाय, यामुळे केसांमध्ये फाटे फुटण्याची समस्या अधिक प्रमाणात वाढते.अशा परिस्थितीमध्ये तुम्ही जास्त वाढलेले केस हे ट्रिम केले तर ते केस चांगल्या पद्धतीने वाढतात आणि केसांमधील फाटे निघून जाण्यास मदत होते.हेअर स्ट्रेटनर आजकाल मुलींमध्ये हेअर स्ट्रेटनिंग करण्याचे प्रमाण बरेच वाढले आहे. हेअर स्ट्रेटनिंगचा वापर करून केस स्टाईल करणे, केस सरळ किंवा कर्ली करणे इत्यादी अनेक हेअरस्टाईल्स केल्या जातात. परंतु, केसांवर सतत हेअर स्ट्रेटनिंगचा वापर केल्याने केस तुटण्याची समस्या निर्माण होते. शिवाय, केस अधिक कोरडे आणि फ्रिझी होतात. परिणामी, केसांमध्ये फाटे फुटण्याची समस्या होते आणि केस खराब दिसतात.

इेश्रश्रूव चित्रपटात दाखवतात तसं लाल कापड दाखवून रेल्वे थांबवता येते का?

Bollywood चित्रपटात दाखवतात तसं लाल कापड दाखवून रेल्वे थांबवता येते का?

हिंदीमध्ये डब केलेला शिवाजी द बॉस हा चित्रपट आठवा. त्यात हिरो हिरॉईनला पटवण्यासाठी तू भेटायला आली नाहीस तर मी रेल्वेखाली जीव देईन असं म्हणतो. अन् हिरॉईन त्याला वाचवण्यासाठी तिच्या लाल साडीचा पदर हलवत रेल्वे थांबवते. पण खरंच असं लाल रंगाचे कापड दाखवून रेल्वे थांबवता येते का?चित्रपटात दाखवल्याप्रमाणे ट्रेन पायलटला अचानक लाल कपड्यासारखे काहीही दिसल्यास ट्रेन थांबवावी लागते, हे खरे आहे का, तिथे थांबा नसला तरी रेल्वे थांबते का ? या प्रश्नाचे उत्तर पाहुयात. होय, हे १०० टक्के खरे आहे की जर एखाद्या व्यक्तीने समोरून, म्हणजे ट्रेन ज्या दिशेनं ट्रेन येत आहे, त्या ट्रेनच्या ड्रायव्हरला लाल रंगाचे कापड किंवा तसं काही दाखवलं तर ते आहे. ट्रॅक किंवा ओव्हरहेड वायरमध्ये मोठा बिघाड, रुळावरील अडथळा, पूल कोसळणे, किंवा समोरून दुसरी ट्रेन आल्यामुळे झालेला अपघात इत्यादी आपत्कालीन परिस्थितीमुळे ट्रेन थांबवली जाईल असा विश्वास वाटतो.एखादा व्यक्ती लाल कापड दाखवत असेल तर तो व्यक्ती रेल्वे थांबण्याचा सिग्नल देण्याचा प्रयत्न करत आहे, त्यामुळे क्षणाचाही विचार न करता ट्रेनचा लोको पायलट ताबडतोब ट्रेन थांबवतो. ट्रेन थांबवल्यानंतर संबंधित व्यक्तीकडून गडबडीची माहिती घेतली जाते आणि परिस्थितीनुसार पुढील कारवाई केली जाते.लाल कपडा पाहून पायलटला वाटले पाहिजे की कोणीतरी धोक्याची सूचना देण्यासाठी ते ठेवले आहे, त्याचप्रमाणे लाल कपडा दिसल्यावर पायलट लगेचच रेल्वे थांबवतो. अशी अनेक प्रकरणे घडली आहेत. लाल कापडामुळे अनेक अपघातही मिळाली आहेत.गेल्या वर्षी एका महिलेने लाल साडी दाखवून मोठा रेल्वे अपघात रोखला होता. ती क्रॉस करत असलेला रेल्वे ट्रॅक तुटला मग तिने लाल साडी दाखवून ट्रेनला थांबण्याचा इशारा केला. त्याचप्रमाणे, २०१९ च्या अहवालानुसार, बंगालच्या परगणा जिल्ह्यात असाच एक रेल्वे अपघात रोखण्यात आला होता. अशा परिस्थितीत चालक अडचणीच्या वेळी ट्रेन थांबवू शकतात हे समजू शकते.

वाढत्या प्रदूषणातही फिट आणि हेल्दी राहण्यासाठी काय कराल?

आहारतज्ञ दिनराज मोहिनी आपोणकर– आजकाल बऱ्याच सायन्स फिक्शन मुव्हीमधून उडणाऱ्या गाड्या, हवेतून जाणारे मोठ–मोठे मार्ग, हॉलोग्राम स्क्रीन असं काहीतरी भविष्याचं चित्र दाखवलं जातं. पण याच्या बरोबर उलट चित्र भविष्यात आपल्याला दिसणार आहे.
हो!! म्हणजे धुरामध्ये बुडालेली शहरं, धूर आणि धुक्यातून डोकावणारा सूर्य, संपूर्ण चेहरा झाकेल असे मोठ मोठे मास्क लावलेली लोकं आणि बरंच काही. सध्या आपल्याकडे अशी परिस्थिती आलेली नसली तरीही, डब्ल्यू एच ओच्या माहितीनुसार जगातील ८० टक्के देशांमधील हवेची पातळी सर्वसामान्य स्तरापेक्षा खूप खालावलेली आहे. ज्यामुळे शहरी भागामध्ये श्वसनाचे आणि हृदयविकाराचे आजार वाढत चाललेले आहेत. सध्या भारतात दिल्ली आणि आजूबाजूच्या परिसरात प्रदूषणाची पातळी धोकादायक टप्प्यापर्यंत वाढलेली आहे. ज्यामुळे तेथे राहणाऱ्या लोकांच्या श्वसनसंस्थेवर परिणाम होऊ लागला आहे. मुंबईत देखील हळूहळू प्रदूषणाची तीव्रता वाढत चाललेली असताना, २०२३ च्या दिवाळीनंतर ही तीव्रता अधिक वाढण्याची शक्यता आहे. म्हणूनच आपण जाणून घेऊया, आहारातील काही घटक, जे वातावरणातील या प्रदूषणाशी फाईट करतील!! प्रदूषक: पार्टीक्युलेट मॅटर. हवेमध्ये असणारे २.५ –प१० मायक्रोमीटर इतक्या आकाराचे प्रदूषण करणारे घटक. त्यामुळे होणारे आजार/ लक्षणे : अस्थमा आणि उजझऊ (क्रॉनिक ऑबस्ट्रक्टिव्ह पल्मनरी डिसऑर्डर, श्वास घेण्यात अडथळा आणि खोकला) असलेल्या लोकांना पार्टीक्युलेट मॅटरचा अधिक प्रमाणात त्रास होऊ शकतो.ज्यामध्ये श्वसन मार्गाला सूज येणे, घसा खवखवणे, श्वसनसंस्थेचे आकुंचन यासारखी लक्षणे दिसून येतात. आहार : ओमेगा थ्री फॅटी ॲसिडयुक्त पदार्थ – मासे (मुख्यत्वे बांगडा, सुरमई), अळशीच्या बिया, सूर्याफुलाच्या बिया, अक्रोड, सोयाबीनऑइल, शिंपले.ओमेगा थ्री फॅटी ॲसिड हे एक प्रकारचे फॅट असून ते माशांमध्ये अधिक प्रमाणात आढळून येते. एनसीबीआय या जागतिक दर्जाच्या रिसर्च पेपरमध्ये प्रकाशित झालेल्या रिसर्चनुसार आहारामध्ये ओमेगा थ्री पार्टी ॲसिडयुक्त पदार्थांचा समावेश केल्याने, फुफुसांच्या ॲलर्जीमुळे जमा होणारा घशातील कफ (श्लेष्मा) कमी होऊ शकतो. (३) याशिवाय रक्तामधील ओमेगा थ्री फॅटी ॲसिडचे प्रमाण जास्त असल्यास फुफुसांचे आरोग्य सुधारू शकते.प्रदूषक : नायट्रोजन डायऑक्साईड आणि सल्फर डायऑक्साइड. नायट्रोजन डायॉक्साईड आणि सल्फर डाय–ऑक्साइड हे प्रामुख्याने वाहनांमधून आणि मोठ्या कारखान्यांमधून बाहेर सोडले जातात.त्यामुळे होणारे आजार/ लक्षणे : श्वसन मार्गाला सूज येणे/ जळजळ, अस्थमा, श्वास घेण्यास त्रास,ब्रोन्कायटिस, गंधाची जाणीव न होणे, लहान मुलांच्या फुफ्फुसांची क्षमता कमी होणे, शरीराची ऑक्सिजन वाहून नेण्याची क्षमता कमी होणे, डोकेदुखी, धाप लागणे, ताप सर्दी, छातीत पिवळा श्लेष्मा जमा होणे, कॅन्सर... विटामिन सी युक्त पदार्थांचा आहारात समावेश केल्याने फुप्फुसाचा कॅन्सर, लंग फायब्रोसिस (फुफुसातील लवीओलाय पेशींना इजा होऊन ऑक्सिजन सामावून घेण्याची क्षमता कमी होणे) यासारख्या दीर्घकालीन आजारांपासून संरक्षण मिळते. एनसीबीआय मध्ये प्रकाशित झालेल्या, ११ लोकांवर केल्या गेलेल्या एका डबल ब्लाइंड, प्लासिबू कंट्रोल रिसर्चनुसार, ५०० मिलीग्राम विटामिन सी चा डोस(४ वेळा३ दिवस) नायट्रोजन ऑक्साईडमुळे होणारे फुफ्फुसाचे नुकसान कमी करू शकतो.

भारत–पाकिस्तान फाळणीवेळी ’त्यांनी’ निर्णय घेतला म्हणून आपल्याला मिळाला इंडिया गेट बासमती तांदूळ

दोन भावांनी कमाल केली अन् प्रत्येक घरात पोहोचला इंडिया गेट बासमती तांदूळ

बिर्याणी व्हेज असो वा नॉनव्हेज, किंवा एखाद्या लग्नातील पुलाव तांदूळ तर एकच तो म्हणजे इंडिया गेट बासमती राईस. इंडिया गेट बासमती तांदूळ हा देशातील एक मोठा ब्रँड बनला आहे. लांब, पातळ आणि सुवासिक बासमती तांदूळ पॅक करून इंडिया गेटच्या नावाने विकणारी घठ्इङ या कंपनीचा खूप जुना इतिहास आहे. भारत – पाकिस्तानच्या फाळणीआधी या तांदळाचा जन्म झाला आहे. जो आज देशातला सर्वात मोठा ब्रँड बनला आहे.भारतात राहणाऱ्या खुशी राम आणि बिहारी लाल या दोन भावांनी १८८९ मध्ये लायलपूर येथे तांदूळ, तेल आणि गहू यांचा छोटासा व्यवसाय सुरू केला. लायलपूर आता पाकिस्तानचा भाग आहे. जेव्हा भारत–पाकिस्तानची फाळणी झाली तेव्हा दोन्ही भावांनी पाकिस्तान सोडून भारतात राहण्याचा निर्णय घेतला आणि ते दिल्लीत आले.
इंडिया गेट बासमती ब्रँडची यशोगाथा
या दोघांनी लाहोरी गेटजवळ व्यवसाय सुरू केला. घठ्इङ नावाची कंपनी स्थापन केली. ते यशस्वी करण्यासाठी खूप संघर्ष करावा लागला. मेहनत फळाला आली आणि पुढच्या काही वर्षांत ’इंडिया गेट बासमती राइस’ हा एक मोठा ब्रँड बनला. आज हा तांदूळ भारतातील प्रत्येक घरात पोहोचला आहे.१९८० मध्ये घठ्इङ ने पहिल्यांदा बासमती तांदळाची पाकिटे रशियन बाजारपेठेत पुरवली. त्यानंतर कंपनीच्या बासमती तांदळाची मागणी भारताशिवाय इतर अनेक देशांमध्ये वाढू लागली. कंपनीने जागतिक स्तरावर ब्रँड लाँच करण्याचा निर्णय घेतला आणि वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी जर्मनीमधून विशेष मशीन्स आयात करण्यात आल्या.अशाप्रकारे, १९९३ मध्ये, कंपनी घठ्इङ ने आपला फ्लॅगशिप ब्रँड ’इंडिया गेट’ पॅकेज्ड स्वरूपात सादर केला. घठ्इङ लिमिटेडच्या डायरेक्टर प्रियांका मित्तल सांगतात की, कंपनीने सुरुवातीपासूनच आम्ही आणि विक्रेते दोघांनाही फायदा व्हावा यासाठी दलालांना दूर करण्यासाठी कठोर परिश्रम घेतले आहेत. ज्याच्या आधारावर, आज घठ्इङ हा लाहोरी गेट, दिल्लीचा धान्य आणि मसाल्यांचा सर्वात जुनी कंपनी आहे.या कंपनीने ’माँ के हाथ का खाना’ या मोहिमेद्वारे पॅकेज केलेल्या बासमती तांदळाची जाहिरात करण्यास सुरुवात केली. याशिवाय ’इंका फेव्हरेट पुलाव’ मोहिमेद्वारे कंपनी आपल्या ग्राहकांना इंडिया गेट खरेदी करण्यास सांगत आहे.जर आपण इंडिया गेट बासमती तांदळाच्या संपूर्ण प्रवासावर नजर टाकली तर स्वातंत्र्यापूर्वी सुरू झालेला एक छोटासा व्यवसाय आता ४,००० कोटी रुपयांच्या उत्पन्नासह एक यशस्वी व्यवसाय म्हणून उभा आहे. त्याने १९९८ मध्ये कंपनीने स्वत:चा खझज लाँच केला. त्याच्या वार्षिक अहवालानुसार, घठ्इङ चा आर्थिक वर्ष २०२१ मध्ये महसूल ३९९१ कोटी रुपये होता. सध्या ९५,००० शेतकरी कंपनीशी निगडीत आहेत. विशाल नेटवर्कसह घठ्इङ अंतर्गत १४ ब्रँड लाँच केले. या शेतकऱ्यांकडून तांदूळ खरेदी केला जातो. कंपनीचा दावा आहे की ते आपल्या ग्राहकांना उच्च दर्जाचे तांदूळ देतात, जे लोकांना खूप आवडले. प्रियांका म्हणते की, आमच्याकडे असलेल्या सर्व ब्रँडपैकी इंडिया गेट बासमती तांदूळ हा फ्लॅगशिप ब्रँड आहे.पुढे जाऊन, कंपनी शाश्वत शेती पद्धती आणखी मजबूत करण्याची योजना आखत आहे. ज्यामुळे शेतीकडे तरूणांचा कल वाढेल आणि अनेक रोजगाराच्या संधीही उपलब्ध होतील.

लोकांमध्ये बोलण्याची वाटते भीती? सोशल एंग्जायटी ’हा’ आजार काय आहे? जाणून घ्या लक्षणे

ज्या लोकांना सतत घरातच रहायला आवडते किंवा ज्यांना घरामध्ये रहायला कम्फर्टेबल वाटते, अशा प्रकारचे लोक सोशल फोबिया किंवा सोशल एंग्जायटीच्या आजाराने ग्रस्त असण्याची शक्यता असते.जे लोक सोशल एंग्जायटीकडे एक सामान्य समस्या म्हणून दुर्लक्ष करतात. अशा लोकांनी हे समजून घेणे गरजेचे आहे की, ही एक सामान्य समस्या नसून हा एक गंभीर आजार आहे.सोशल एंग्जायटी हा एक प्रकारचा मानसिक आजार आहे. जर्नल ऑफ एंग्जायटी डिसऑर्डरच्या एका अहवालानुसार जगभरातील एकूण ७% लोक हे सोशल एंग्जायटी या आजाराने पीडित आहेत. या आजारातून सुटका मिळवणे हे शक्य आहे.मात्र, त्याआधी आपण सोशल एंग्जायटी म्हणजे काय? आणि याची लक्षणे कोणती? त्याबद्दल आज या लेखातून जाणून घेणार आहोत.सोशल एंग्जायटी म्हणजे काय? सोशल एंग्जायटी ही एक प्रकारची सामाजिक भीती आहे. ज्यामध्ये एखादी व्यक्ती ही लोकांना भेटताना किंवा लोकांशी बोलायला घाबरते आणि त्या परिस्थितीशी संबंधित नकारात्मक आणि अतार्किक गोष्टींचा विचार करते. ज्यामुळे, त्या व्यक्तीला लोकांमध्ये स्वत:ला व्यक्त करणे हे आव्हानात्मक वाटते आणि त्या व्यक्तीला लोकांमध्ये मिसळण्याची भीती वाटते.सोशल एंग्जायटीची लक्षणे कोणती?सामाजिक कार्यक्रमांमध्ये जाण्याची भीती सोशल एंग्जायटीने ग्रस्त असलेल्या व्यक्तींना लोकांमध्ये जाण्याची किंवा पार्टी, घरगुती कार्यक्रम, सामाजिक कार्यक्रम इत्यादी कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याची भीती वाटते. त्यामुळे, या व्यक्ती अशा कार्यक्रमांना जाण्याचे टाळतात.सोशल एंग्जायटीने ग्रस्त असलेल्या लोकांना या कार्यक्रमांमध्ये आपण सहभागी झाल्यास इतर लोक आपल्याला जज करतील, अशी सतत भीती वाटत राहते.लोकांमध्ये बोलण्याची वाटते भीती सोशल एंग्जायटीने ग्रस्त असलेल्या व्यक्तीला लोकांमध्ये मिसळण्याची आणि लोकांमध्ये जाऊन बोलण्याची भीती वाटते. लोकांसमोर व्यक्त होणे, लोकांसमोर बोलणे इत्यादी गोष्टी त्या व्यक्तीला आव्हानात्मक वाटतात.

केसांच्या अनेक समस्यांची सुट्टी करेल ‘अळशी’, कसे वापरायचे ते पहा!

रोजच्या चुकीच्या आहारामुळे चुकीच्या लाइफस्टाइलमुळे आपल्या शरीरावर वाईट परिणाम होतो. शरीराच्या प्रत्येक भागावर होतो तशाच केसांच्या समस्यांमध्ये वाढ होते. यात केस तुटणे, गळणे आणि कोरडे होण्याचा त्रास होत असेल तर आयुर्वेदातील एक पदार्थ तुम्हाला मदत करणार आहे.तुम्ही फ्लेक्ससीड किंवा आळशीच्या बियांबद्दल ऐकले असेल. तर या बिया तुमच्या केसांसाठी बेस्ट आहे. यात असलेले जीवनसत्त्वे आणि खनिजे केस गळणे टाळतात आणि कोरडेपणा दूर करून चमक देण्यास मदत करतात.हिवाळ्यात केसांची विशेष काळजी घ्यावी लागते. कारण जसे त्वचा कोरडी पडते तसेच आपले केसही कोरडे होतात. फ्लेक्ससीड केसांसाठी खूप फायदेशीर मानले जाते. फ्लेक्ससीड हिवाळ्यात केसांना चमक आणि मुलायमपणा प्रदान करते.फ्लेक्ससीड तुमच्या केसांचा कोरडेपणा कमी करण्यास मदत करते. आणि आपण घरी सहजपणे फ्लेक्स सीडचा हेअर मास्क बनवू शकता. ज्याचा नियमित वापर केला. तर तुमचे केस मुलायम होतील.फ्लेक्ससीड आणि केळीचा मास्क केळी हेअर मास्कचे अनेक फायदे आहेत. हा हेअर मास्क बनवण्यासाठी तुम्हाला केळी, फ्लेक्ससीड जेल, हनी स्पून आणि बदामाचे तेल लागेल. सर्व प्रथम एका भांड्यात १ केळी चांगले मॅश करून घ्या. आता त्यात मध, बदामाचे तेल आणि ४ चमचे फ्लॅक्ससीड जेल टाका. सर्वकाही मिसळून पेस्ट तयार करा. केसांना मुळांपासून लांबीपर्यंत पूर्णपणे लावा आणि ३० मिनिटे तसेच ठेवा.फ्लेक्ससीड आणि दही हेअर मास्क जर तुमचे केस खूप गळत असतील तर हा घरगुती हेअर मास्क नक्कीच वापरून पहा, केस गळणे पूर्णपणे थांबेल. हे हेअर मास्क बनवण्यासाठी तुम्हाला फ्लॅक्ससीड जेल, दही आणि कोरफड व्हेरा लागेल.सर्व प्रथम एका भांड्यात अर्धा वाटी घट्ट दही घ्या, आता त्यात ३ चमचे कोरफडीचे जेल आणि ३ चमचे फ्लॅक्ससीड जेल घाला. ही पेस्ट केसांना लावा आणि २० मिनिटे राहू द्या. यानंतर सौम्य शैम्पूने धुवा.

केसांच्या अनेक समस्यांची सुट्टी करेल ‘आळशी’, कसे वापरायचे ते पहा!

फ्लेक्ससीड कोरफड हेअर मास्क हा हेअर मास्क बनवण्यासाठी तुम्हाला एलोवेरा जेल, राइस स्टार्च आणि फ्लेक्ससीड जेल घ्यावे लागेल. यानंतर १ वाटी ताजे एलोवेरा जेल घ्या. आता त्यात अर्धी वाटी भिजवून बारीक पेस्ट केलेले तांदळाचे पीठ घाला.आता त्यात ४ चमचे फ्लॅक्ससीड जेल टाका, मिक्स करा आणि पेस्ट तयार करा. हा हेअर मास्क केसांना लावा आणि ३० मिनिटांनी केस धुवा.ऑलिव्ह ऑइल, लिंबाचा रस आणि फ्लेक्ससीड पावडर हेअर मास्क हा हेअर मास्क बनवण्यासाठी तुम्हाला फ्लेक्ससीड पावडर, ऑलिव्ह ऑईल आणि लिंबाचा रस लागेल. सर्व प्रथम, एका भांड्यात दोन चमचे फ्लेक्ससीड पावडर, ऑलिव्ह ऑईल आणि अर्धा चमचा लिंबाचा रस मिसळा.आता हे मिश्रण चांगले फेटून घ्या. ते तुमच्या केसां मूळांपासून शेवटपर्यंत लावा. आता ते तसेच ठेवा आणि ३० मिनिटांनी केस धुवा.महत्त्वाची टिप केस कोरडे होणे, फाटे फुटणे यामुळे केसांना पोषण मिळत नाही. तुम्ही आळशीच्या बियांचा वापर सतत केसांसाठी केलात तर त्यांना योग्य प्रमाणाच पोषण मिळतं. ज्यामुळे केस नैसर्गिकरित्या मुलायम आणि चमकदार होतात.

माजी विद्यार्थ्यांचे मेळावे आयोजित होणे काळाची गरज.संचालक अँड श्रीकांत अप्पा उटगे

लातूर दि. १८ (प्रतिनिधी) आज देशाला चांगल्या विचारांची गरज असून तो विचार आपण विविध क्षेत्रात राहून देखील जोपासत आहात याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. मित्रत्वाचं नातं काय असतं हे अनेकांनी मनोगत व्यक्त करताना आपल्या भावना व्यक्त केल्या. अलिकडे गेट-टुगेदरचे आयोजन देखील मोठ्या प्रमाणावर गावोगावी माजी विद्यार्थ्यांकडून केले जात आहे. त्यापैकीच एक असलेले लातूरच्या श्री महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील १९९३-९४ बँचचे माजी विद्यार्थी २९ वर्षांनी एकत्र जमून स्नेह मेळावा आयोजित करतात असे एकत्र येणे आजच्या काळाची गरज असल्याचे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे जेष्ठ संचालक अँड. श्रीकांत अप्पा उटगे यांनी अध्यक्षीय समारोप करताना केले. लातूरच्या महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात नुकताच स्नेह मिलन मेळावा संपन्न झाला यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी विचारमंचावर महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे भूगोल विभाग प्रमुख डॉ. बाळासाहेब गोडबोले, माजी प्राचार्य डॉ. एम. एस. दडगे, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, माजी विद्यार्थी तथा सेवानिवृत्त सहसंचालक विजयकुमार तोगरे, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, प्रा. डॉ. महेश मोटे, प्रा. डॉ. मच्छिंद्र खंडागळे, सुवर्णा गीरवलकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी भूगोल विभाग प्रमुख डॉ. बाळासाहेब गोडबोले, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, माजी विद्यार्थी विजयकुमार तोगरे व सुवर्णा गिरवलकर यांनी संस्था, महाविद्यालय व गुरुवर्यांविषयी मनोगतातून आपल्या भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धनाजी तोडकर, हनुमान रांदड, अंगद पवळे, सतिश गायकवाड, महेश मोटे, नागेश सोनटक्के, अनिता यादव, शिरीष पाटील आदींनी पुढाकार घेतला. तसेच लक्ष्मण बदिमे, प्रा. ज्ञानोबा गायकवाड, डॉ. सुभाष कुमार, शिवाजी कोराटे, किरण भुसे, रमेश चव्हाण, राजाभाऊ हराळकर, राजकुमार केंचे, माधव पुंडकरे, जलील शेख, रोहिणी स्वामी, सुनिता सूर्यवंशी, दिगंबर मिटकरी, जानुमियाँ शेख, विलास कराड, सोपान शिंदे, रमेश बर्गे, कृष्णा चेपट, किरण टेकाळे, सतिश पुंड, सिद्धलिंग हुच्चे, बालाजी शेळके, नामदेव बेंदरगे, दिलीप मिंड आदींनी विविध क्षेत्रात काम करत असल्याचा स्वतः चा परिचय व शिक्षण घेत असतानाच्या महाविद्यालयातील जुन्या आठवणींना उजाळा देऊन महाविद्यालय व शिक्षकांविषयी यावेळी भावस्पर्शी मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मच्छिंद्र खंडागळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंगद पवळे तर आभार सतिश गायकवाड यांनी मानले. यावेळी बहुसंख्येने माजी विद्यार्थी उपस्थित होते.

न. मु. जिल्हाध्यक्ष - राजेंद्र (दादा) गायकवाड यांचा दनका हॉस्पिटल पिडीत नागरिकांना मिळाला न्याय

(आरपीआय - आ) राष्ट्रीय अध्यक्ष दिपक (भाऊ) निकाळजे यांच्या वतीने नवी मुंबई जिल्हाध्यक्ष - राजेंद्र (दादा) गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली हॉस्पिटल पीडित नागरिकांना मिळाला न्याय..नवी मुंबई पक्ष समिती राष्ट्रीय अध्यक्ष दिपक (भाऊ) निकाळजे यांच्या पक्षाचा मुजोर हॉस्पिटल ला दणका

नवी मुंबई / के. एच. हनवते :-

(जुईनगर) येथील मंगल प्रभू हॉस्पिटल संदर्भात दीपक (भाऊ) निकाळजे (आरपीआय) यांच्या वतीने नवी मुंबई रिपब्लिकन पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना तक्रार प्राप्त झाल्यानंतर नवी मुंबई जिल्हाध्यक्ष राजेंद्र (दादा) गायकवाड सह नवी मुंबई जिल्हा प्रभारी प्रकाश पवार (गोळवसकर) व पिंपरी चिंचवड कार्याध्यक्ष सुनील (भाऊ) ढसाळ यांच्या नेतृत्वाखाली मंगल प्रभू रुग्णालयावर धडक दिली. हॉस्पिटलमध्ये प्रशासनाला खरमरीत जाब विचारून रुग्णाला व त्याच्या आई - वडिलांना न्याय मिळवून दिला व हॉस्पिटल प्रशासनाला दीड लाख रुपये माफ करून रुग्णाला डिस्चार्ज देण्यास भाग पाडले. सदर प्रसंगी रुग्णाच्या नातेवाईकाने पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. सदर प्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे उपाध्यक्ष गौतम चव्हाण, रोहित एरंडे तसेच दीपक (भाऊ) निकाळजे यांच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (-) नवी मुंबई जिल्हा सरचिटणीस निवास साबळे, संपर्कप्रमुख प्रतीक यादव, संघटन सचिव सुदत्त खरात, ऐरोली विधानसभा अध्यक्ष अमोल जावळे, बेलापूर विधानसभा उपाध्यक्ष माणिक कांबळे तसेच महावीर गायकवाड, प्रतीक डोलारे व खुर्शीद खान हे देखील उपस्थित होते.

MP मंगल प्रभु हॉस्पिटल
HOMEOPATHY CLINIC
NO PARKING

लातूर येथे बामसेफचे एकदिवसीय प्रशिक्षण शिबीर संपन्न

लातूर : - १२ नोव्हेंबर २०२३ रोजी स्पीकमेट इंग्लिश स्पोकन क्लास, शिवाजी चौक ,लातूर येथे बामसेफचे एक दिवसीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर संपन्न झाले. लातूर बामसेफ जिल्हा युनिट व मूलनिवासी संघ ,जिल्हा लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या या प्रशिक्षण शिबिरात सुमारे २५ ते ३० प्रशिक्षणार्थी स्वयंस्फूर्तपणे उपस्थित होते.

या वेळी प्रा.जितेंद्र सूर्यवंशी (माजी उपाध्यक्ष ,बामसेफ)आणि एड.भारत ननवरे (महासचिव ,मूलनिवासी संघ ,महाराष्ट्र)यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रशिक्षणादरम्यान बामसेफचे महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी सदस्य आश्विनकुमार डावरे ,बीड हे प्रशिक्षक म्हणून उपस्थित होते. त्यांनी बामसेफची ओळख भारताच नव्हे ,तर जगात केडर बेस संघटन म्हणून आहे, हे सोदाहरण स्पष्ट करून सांगितले. आपल्या भाषणात पुढे बोलताना ते म्हणाले की,बामसेफ ही जगातील नवीन नेतृत्व निर्माण करणा-या अनेक संघटनांपैकी देशपातळवरील मूलनिवासी बहुजन समाज संघटन करणारेएकमेव मोठे संघटन आहे. बामसेफ हे सामाजिक व्यवस्था परिवर्तन निर्माण करण्यासाठी गेल्या पन्नास वर्षांपासून अविरतपणे संघर्ष करीत आलेले संघटन असून ,ते मास बेस, ब्रॉड बेस आणि केडर बेस असे आहे. तसेच समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय या चतुर्विध मानवी मूल्यांवर अधिष्ठित असणारे संघटन आहे . वर्तमानातील राजकीय आणि सामाजिक परिस्थितीचे संदर्भ देत व्यवस्था परिवर्तनाच्या लढाईसाठी प्रशिक्षण महत्त्वाचे आहे. त्यांनी सामाजिक जनजागृतीची आवश्यकता व मूलनिवासी बहुजनांच्या गुलामीची कारणे, या घटकांवर आधारित सविस्तर मांडणी केली. पुढील काळात मूलनिवासी बहुजन समाज हा विशिष्ट उद्देशाने प्रेरित होऊन फुले-आंबेडकरी आंदोलन यशस्वी करण्याकरिता कटिबद्ध राहील.समाजातील सर्व घटकांपर्यंत संविधानिक हक्क आणि अधिकाराबद्दल जागृती घडवणे आवश्यक आहे . या एक दिवसीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरात प्राय: भारतीय संविधान,सन्मान, सुरक्षा व संवर्धनाची आवश्यकता का व कशासाठी आहे ,या व इतर अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर एकत्र चर्चा करण्यात आली.

बामसेफचे लातूर जिल्हाध्यक्ष बी .के.भाले व मूलनिवासी संघ जिल्हाध्यक्ष भरत मोटे यांच्या संपर्कातून या वेळी प्रशिक्षणार्थी उपस्थित झाले होते . लातूर जिल्ह्यातील बामसेफचे सचिव - हर्षवर्धन सूर्यवंशी,मूलनिवासी संघ ,लातूर जिल्हा सचिव मुबिन सय्यद ,मूलनिवासी सभ्यता संघाचे वरिष्ठ कार्यकर्ते नंदू खंडागळे ,. एड.भारत ननावरे , अ‍ॅड.राजेंद्र लातूरकर , अ‍ॅड . सचिन कांबळे ,मूलनिवासी संघ लातूरचे जिल्हाध्यक्ष भरत मोटे , हे उपस्थित होते.प्रा. जितेंद्र सूर्यवंशी यांच्या आभारप्रदर्शनानंतर कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराची सांगता झाली .

मंत्रिमंडळातून काढून टाका म्हणणाऱ्या संभाजीराजेंना भुजबळांचं प्रत्युत्तर; म्हणाले, तुम्ही एका समाजाचे...

ओबीसींच्या व्यासपीठावरुन जालन्यात छगन भुजबळांनी मराठा आरक्षणासाठी लढणारे मनोज जरांगे यांच्यावर घणाघाती टीका केली होती. तसेच चिथावणीखोर भाषण केलं होतं. यानंतर संभाजीराजे छत्रपती यांनी भुजबळांच्या भाषणावर संताप व्यक्त करत सरकारनं त्यांची मंत्रिमंडळातून हाकालपट्टी करावी अशी मागणी केली होती.त्यांच्या या भूमिकेला आज भुजबळांनी प्रत्युत्तर दिलं आहे. इगतपुरी इथं ओबीसी मेळाव्यात ते बोलत होते.

तुमचा आदर करतो पण...छगन भुजबळ म्हणाले, संभाजीराजे काल म्हणाले की भुजबळ दोन समाजात वितुष्ट निर्माण करत आहेत त्यांना मंत्रिमंडळातून काढून टाका. संभाजीराजे आम्ही तुमचा आदर सन्मान करतो कारण आमच्या हृदयात असलेले शाहू महाराज ज्यांनी मागासवर्गीयांना वरती आणण्यासाठी त्यांची बाजू घेऊन लढत होते. आम्ही फुले-शाहू-आंबेडकर म्हणतो ना ते शाहू महाराज आहेत तुम्ही कोणा एका समाजाचे नाहीत त्या शाहू महाराजांच्या गादीवर तुम्ही तिकडे आहात, तुम्ही एका समाजाचे नाहीत. या राज्यातील सर्व समाजाचे आहात. तुम्ही एकाच समाजाची बाजू घेऊ कसे बोलता? एकतर तुम्ही या आरक्षणाच्या आंदोलनात यायलाच नकोत. आलात तर तुम्ही सांगायला पाहिजे की तुम्ही सर्वांचे अधिकार शाबूत ठेवा. कोणावरही अन्याय करु नका. ही अपेक्षा संभाजीराजेंकडून आम्हाला आहे, अशा शब्दांत भुजबळांनी संभाजीराजेंना आवाहन केलं. तेव्हा तुम्ही कुठे होता? माझ्यावर आरोप करण्यापेक्षा घरदारं कोणी जाळली मी जाळी का? असा सवाल करताना दोन महिने जे काही राज्यात चाललं आहे त्यावेळी तुम्ही गप्प बसलात. तुमचं काम होतं की असं करु नका. तुम्ही स्वतः जायला पाहिजे होतं बीडला. लोकांची घरं जाळण्यात आली, पेट्रोल बॉम्ब फेकण्यात आले सगळीकडे.तुम्ही त्यांचे अश्रू पुसायला पाहिजे होते ते तुमचं काम नाही का? एक लक्षात ठेवा छगन भुजबळांना मंत्रीपदाची पर्वा नाही आणि आमदारकीची पण पर्वा नाही. तो लढेल गोरगरीबांसाठी लढेल. छत्रपती शाहूंच्या गादीवर तुम्ही बसता त्यामुळं सर्वांना न्याय द्या, कोणावरही अन्याय होणार नाही याची काळजी घ्या. प्रकाश आंबेडकरांना विनंती प्रकाश आंबेडकरांना देखील माझी विनंती आहे की, त्यांनी देखील आम्हाला सहकार्य करायला पाहिजे. आम्हाला सांगा ना आम्ही कुठे चुकलो? राज्यात काय चाललं आहे ते आम्हाला सांगा. त्याच्यावर विचार करा, आम्ही तुमच्याकडून सहकार्याची अपेक्षा करतो, दूर ढकलण्याची नाही. राज्यातील जे वेगवेगळे पक्ष असतील, समाज असतील किंवा विविध पदांवर काम करणारे लोक असतील त्यांच्याकडून माझी हीच अपेक्षा आहे की त्यांनी आमचं सुद्धा ऐकून घ्याव. मग आम्हाला सांगा आमच चुकलं कुठे?

आंबरनाथ येथे लहुजी वस्ताद साळवे आणि सुभेदार रामजी (बाबा) सकपाळ यांची संयुक्त जयंती उत्साहात साजरी

बहुजन मुक्ती पार्टी
BMP

आंबरनाथ प्रतिनिधी :- जगेन तर देशासाठी मरेन तर देशासाठी..! - लहुजी वस्ताद साळवे व सुभेदार रामजी (बाबा) सकपाळ बाबासाहेब यांचे पिताश्री या दोन्ही महापुरुषांची संयुक्त जयंती आंबरनाथ येथे बहूजन मुक्ति पार्टी यांच्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली. जगेन तर देशासाठी मरेन तर देशासाठी हि प्रतिज्ञा लहुजीनी केली होती त्याप्रमाणे आपले संपूर्ण आयुष्य देशसेवेकरीता वाहिले. आणि अध्यसमाज सुधारक क्रांती महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्याकरीता त्याच्या पाठीशी पहाडासारखे उभे होते म्हणून सावित्रीबाई फुले यांच्या मुलींच्या शिक्षणासाठी विद्यार्थ्यांची जमवा जमव करून मुलींच्या शिक्षणासाठी लहुजीनी पुण्यातील सनातण्याचा बंदोबस्त करुन म. फुले यांना आधार दिला लहुजी वस्ताद साळवे यांनी अनेक क्रांतीकारी लढे लडविले वासुदेव बळवंत फडके, उमाजी नाईक यांच्या सारख्या लोकांना पाठबळ दिले. आज महिलाची शैक्षणिक प्रगती आहे ती लहुजी आणि म. फुले व सावित्रीबाई फुले यांना दिलेल्या संरक्षनामुळे नाहीतर सनातण्यांनी म. फुले यांना कधीच संपून टाकले असते म्हणून म्हणतो महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या गुरूचे गुरू कोण होते ? तर ते मातंगसमाजातीलवस्तादलहूजीसाळवे होते. त्याचे देशाच्या स्वातंत्र्यासाठीचे व शैक्षणिक कार्यकरीता केलेले योगदान महान आहे व यांचा विसर आम्हाला पडता कामा नये त्यांच्या विचारांचा वारसा पुढे चालू ठेवून सर्व भारतीयांनी त्यांच्या कार्यास नमन करण्याचा आजचा दिवस आहे आसे विचार हनवते सर यांनी मांडले. लहुजी वस्ताद साळवे यांच्या जीवनातील अनेक दुर्मिळ प्रसंग सांगितले त्याच प्रमाणे डॉक्टर इंगोले, बापू मेश्राम, गजभिये यांनी सामाजिक विषयांवर आपले मोलाचे विचार मांडले. सोनोने यांनी आजचा कार्यक्रम घडवून आणण्यासाठी मोलाचं सहकार्य केले.

अंजली दमानिया यांच्या आरोपांना छगन भुजबळांचं उत्तर; म्हणाले ओबीसी...

मुंबईः सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी शनिवारी छगन भुजबळ यांच्यावर गंभीर आरोप केले होते. भुजबळांनी बेकायदेशीररित्या घर बळकावल्याचं सांगत त्यांनी मूळ घराचे कुटुंबिय सोबत आणले होते. सुरुवातीला भुजबळांच्या घरासमोर त्यांना बोलू दिलं नव्हतं. नंतर त्यांनी पत्रकार परिषद घेऊन भुजबळांवर आक्षेप घेतले.अंजली दमानिया यांच्या आरोपांना मंत्री छगन भुजबळ यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. ते म्हणाले की, अंजली दमानिया यांच्याबद्दल मी अधिक काही बोलणार नाही. सुपारी घेऊन बोलणाऱ्या लोकांबद्दल मी काय बोलणार? आम्ही कुणाचंही घर लाटलेलं नाही. या प्रकरणाची केस कोर्टामध्ये सुरु असून जो निकाल येईल, तो आम्हाला मान्य असेल.भुजबळ पुढे म्हणाले की, घरासंबंधीचे कागदपत्र आमच्याकडे आहेत. परंतु मी या कंपनीचा डायरेक्टर नाही. आमचे लोक आहेत. हे सगळं असलं तरी दमानिया यांना असं नाटक करायचं आजच कसं सुचलं? एकीकडे ओबीसींचा लढा सुरु असताना दुसरीकडे असे आरोप केले जात आहेत. काहीही झालं तरी न्यायाच्या पलीकडे मी अजिबात जाणार नाही.दरम्यान, छगन भुजबळ यांनी जालन्याच्या अंबडमध्ये घेतलेल्या सभेची खूपच चर्चा झाली.

महाराष्ट्राने अनेक संकटं झेलली पण अशी परिस्थिती कधीच नव्हती - संजय राऊत

ठाकरे गटाच्या शिष्टमंडळाने आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी राज्यातील सध्याची चिंताजनक परिस्थिती राष्ट्रपतींसमोर मांडली. महाराष्ट्राने अनेक संकट झेलली पण अशी परिस्थिती कधीच नव्हती.मंत्री जाहीर सभेतून एकमेकांना आव्हान देत आहेत. एक सर्वसमावेशक भूमिका घेऊन आम्ही राष्ट्रपतींची भेट घेतल्याचे संजय राऊत यांनी स्पष्ट केले.

इतर कोणाच्याही आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला सामावून घेताना घटनेत तरतूद करून घ्यावी.हे सगळ संसद आणि केंद्र सरकारच्या हातात आहे. येत्या अधिवेशनात विशेष प्रस्ताव आणून तो या सोडवावा, अशी मागणी ठाकरे गटाने राष्ट्रपतींकडे केली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आश्वासन दिलं आहे की या विषयात लक्ष घालून तोडगा काढण्याबाबत चर्चा केली जाईल, अशी माहिती संजय राऊत यांनी दिली आहे. राज्यात शांतता राहावी, तो दुभंगला जाऊ नये ही आमची भूमिका आहे.आरक्षणाची मर्यादा वाढवायची असेल तर ती संसदेत आणावी लागते. मग हे राज्यात काय करणार आहेत? ते टिकत नाही हे अताच्या हरियाणावरून दिसून आलं आहे. येत्या अधिवेशनात सर्वसमावेशक आरक्षण द्यावे, अशी मागणी संजय राऊत यांनी केली. सर्वपक्षीय शिष्टमंडळ केंद्रात आणायचं काम राज्य सरकारने करावं.

राज्य सरकार घटनाबाह्य असलं तरी त्यांनी घटना दुरुस्ती करावी. पंतप्रधान किंवा गृहमंत्री यांना विषय माहीत नाही का? ते राज्यात आले तेंव्हा जारांगे उपोषणाला बसले होते, असे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT
No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR
TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE